मार्च - २०२४ * अंक- ९ वा

# अजिंठा

## रोटरी क्लब जळगाव

क्लब क्र.15512 रो.डिस्ट्रीक्ट 3030 रोटरी वर्ष 2023-24





आर.आय.प्रेसिडेंट
रो. गॉर्डन आर. मॅकइनली



डिस्ट्रिक्ट गव्हर्नर
रो. आशा वेणुगोपाल



प्रेसिडेंट
रो. मनोज जोशी



ऑन.सेक्रेटरी
रो. ॲड. हेमंत भंगाळे



बुले.कमिटी चेअरमन
रो. स्वाती ढाके

CREATE HOPE in the WORLD

### संपादकीय....

सर्व बंधू भगिनींना रोटरी प्रणाम!

सर्वप्रथम जागतिक महिला दिना निमित्त क्लब मधील सर्व महिलांना जागतिक महिला दिनाच्या हार्दिक शुभेच्छा ! पुढील वर्षी आपल्याला परत एकदा रोटरी इंटरनॅशनल प्रेसिडेंट स्टेफिन उरचिक म्हणून महिला रोटेरियन लाभणार आहे.

जल म्हणजे पाणी हे मानव व पृथ्वीवरील प्रत्येक जीवासाठी अत्यंत महत्त्वाचा घटक आहे पाण्याशिवाय जीवनाची कल्पना करणे व्यर्थ आहे. पृथ्वीवरील दूषित पाण्याची पातळी वाढत आहे आणि पिण्यायोग्य पाण्याची पातळी कमी होत आहे. ही चिंतेची बाब आहे, हे टाळण्यासाठी पाण्याचे संवर्धन करणे, आपल्यासाठी अत्यंत आवश्यक आहे .देशातील अनेक जिल्ह्यांमध्ये नागरिकांना पिण्याच्या पाण्यासाठी अनेक किलोमीटर प्रवास करावा लागतो. पाण्याच्या कमतरतेमुळे हवामान बदलावरही परिणाम होतो. ज्यामुळे वाळवंटाची निर्मिती होते म्हणूनच पावसाळ्यात पाणी साठवण्याबाबत लोकांना जागृत करणे आवश्यक आहे. नद्या, तलाव वाचवावे लागतील. कारखान्यातून निघणारी घातक रसायने नद्यांमध्ये विलगीकरण न होऊ देणे .पाण्याचे महत्व पटवून देण्यासाठी २२ मार्च रोजी पाणी वाचवा हा दिवस साजरा केला जातो. मार्च हा रोटरीचा 'पाणी व स्वच्छता' हा डेसिग्नेटेड मंथ आहे. या महिन्यात आपण त्याबाबत जागरूकता विषयक प्रोजेक्ट करतो.

सर्व रोटेरियन्सला विनंती आहे की, बुलेटीनमध्ये प्रकाशित होणारे लेख यासाठी सर्वस्वी लेखक जबाबदार आहे. त्याचा संपादकाशी कोणताही संबंध नाही. याची कृपया सर्वांनी नोंद घ्यावी. आपले बुलेटीन जास्तीत जास्त चांगल्या प्रकारे होण्यासाठी सर्वांनी उत्साहाने ,उत्स्फूर्तपणे सहभाग नोंदवावा.

**– रो. स्वाती ढाके**

### रोटरी स्वयंसेवक

अशी लोकं तुम्हांला दूरवरच्या इस्पितळात, शरणार्थी शिबिरात, तात्पूर्त्या दवाखान्यातून, व स्वत:च्या समाजात कामे करताना आढळतील ही लोकं व्यवस्थापन, सामाजिक सुधार, शिक्षक, अन्न पुरवठा, स्वास्थ्य सुधार व पाणी व आरोग्याच्या क्षेत्रात तरबेज असतात. ते रोटरी स्वयंसेवक होय.

रोटरी स्वयंसेवक कार्यक्रम स्वयंसेवी कार्यक्रमांना प्रोत्साहन व मदत देतो. असं करतांना रोटरीचं 'सेवा आधी मग स्वत:' हे मूळ आदर्श जाहीर होते. ह्या कार्यक्रमांचे व्यवस्थापन संघ, जिल्हा व आंतरराष्ट्रीय स्तरावर रोटरी स्वयंसेवक करतात. सर्व जगभर बऱ्याच मानवहितकारी योजनात रोटरी स्वयंसेवकांनी आपले नैपुण्य जाहीर केले आहे.

रोटरी सदस्य किंवा जे सदस्य नाहीत त्यांना जर आंतरराष्ट्रीय पातळीवर स्वयंसेवा करण्याची इच्छा असल्यास ते आपली नोंद रोटरी इंटरनॅशनल जागतिक मुख्यालयात करू शकतात. यांची नावे रोटरी सदस्यांच्या डेटाबेस मध्ये www.rotary.org वर नोंदली जातात. स्वयंसेवी सुसंधी व विशेष गरज साधनांत रोटरी स्वयंसेवक आंतरराष्ट्रीय साईट सूचि व डेटाबेस व रोटरी स्वयंसेवक साधन सूचि ह्या दोन्हींचा www.rotary.org वर समावेश आहे. ह्यामुळे स्वयंसेवकांना आपल्या योजना शोधायला सोपे जाते आणि ते स्वत: योजना समन्वयकाशी संपर्क साधू शकतात.

# फेब्रुवारी महिन्यातील साप्ताहिक सभा




**✻ २ फेब्रुवारी –** रोजी आयोजित साप्ताहिक सभेचा विषय होता 'विजयनगर एक सुवर्ण पान (हंपी)' आणि वक्ते होते ॲड.सुशिल अत्रे  यांचा परिचय रो.दिपक चांदोरकर यांनी केला. आभार प्रदर्शन रो.डॉ.जयंत जहागीरदार यांनी केले.



**✻ ९ फेब्रुवारी –** रोजी आयोजित साप्ताहिक सभेत आंपण आपल्या क्लबचा ७५ वा चार्टड डे साजरा केला. यावेळी सन २०२६–२७ साठी प्रांतपाल पदी निवड झाल्या बद्दल डी.जी.एन. डॉ.राजेश पाटील यांचा सत्कार करण्यात आला. आणि ज्येष्ठ रोटेरियन्स् अन्स् यांनी आपले क्लब विषयीचे अनुभव–जुन्या आठवणी सांगितल्या. डॉ.जयंत जहागीरदार यांनी प्रस्तावित केले. समई प्रज्वलन गणेश वंदना सौ.तनया बोरोले, कॅप्टन कुलकर्णी व सारेगामा ग्रुप यांनी बासरीवर हॅपी बर्थ डे गीत सादर केले. प्रेम कोगटा– काल, आज आणि उद्या डॉ.प्रदीप जोशी, डॉ.सौ.कासट, डॉ.राजेश पाटील, मनोज जोशी यांनी मनोगत व्यक्त केले. शेवटी केक कापून साजरा केला.

**✻ १६ फेब्रुवारी –** रोजी आयोजित साप्ताहिक सभेचा विषय होता 'सेल ऑफ रोटरी इन प्रमोटींग वर्ल्ड अंडरस्टॅडींग ॲन्ड गुडविल' या विषयावर पी.पी.रो. उमंग मेहता यांची मुलाखत रो.राघवेंद्र काबरा यांनी घेतली.







**✻ १९ फेब्रुवारी –** दि. २३ फेब्रुवारी रोजी होणारी आपली साप्ताहिक सभा ही १९ फेब्रुवारी रोजी 'पीस ॲन्ड गुडविल कॉन्फरन्स् २०२४' या अंतर्गत घेण्यात आली. ही साप्ताहिक सभा जळगाव मधील सर्व ९ क्लबने एकत्रितरित्या रोटरी भवन मायादेवी नगर येथे आयोजित केली होती.

# फेब्रुवारी महिन्यातील प्रोजेक्टस्




* ३ फेब्रुवारी – रोजी पी.पी.रो.डॉ.तुषार फिरके यांचे विष्णुलीला हॉस्पीटल, नवीन बस स्टॅन्ड मागे, जळगाव येथे धानोरा येथील १२ ग्रामस्थांचे मोफत मोतीबिंदू शस्त्रक्रिया करण्यात आल्या. यावेळी अध्यक्ष मनोज जोशी, मा.सचिव ॲड.हेमंत भंगाळे, डॉ.काजल फिरके, रो.रितेश जैन उपस्थित होते.

# खान्देश अवयव दान प्रबोधन रथ यात्रा

**रो. डॉ. शशिकांत गाजरे**



फेडरेशन ऑफ ऑर्गन अँड बॉडी डोनेशन, मुंबई या महाराष्ट्रात नेत्रदान, त्वचादान, अवयवदान, देहदान या विषयी सर्वांगाने कार्य करणाऱ्या संस्थेच्या विद्यमाने येत्या ५ फेब्रुवारी ते १३ फेब्रुवारी २०२४ या दरम्यान खान्देश विभागात एका प्रबोधन रथयात्रेचे आयोजन करण्यात आले होते. या महादान (नेत्रदान, त्वचादान, अवयवदान, देहदान) प्रबोधन यात्रेला धुळे येथून प्रारंभ करून ही यात्रा साक्री, पिंपळनेर, नंदुरबार, तळोदा, शहादा, दोंडाईचा, शिंदखेडा, शिरपूर, चोपडा, अंमळनेर व जळगाव या ठिकाणांहून मार्गक्रमण केले

१३ फेब्रुवारी २०२४ या दिवशी सकाळी नऊ वाजता एस एम मनियार लॉ कॉलेज तर ११ वाजता धनाजी नाना विद्या प्रबोधिनी संचलित शिरीष मधुकरराव चौधरी कॉलेज येथे कार्यक्रम घेण्यात आले. याप्रसंगी फेडरेशनचे चेअरमन श्री पुरुषोत्तम पवार , श्री प्रशांत पागनीस यांनी मार्गदर्शन केले .तसेच याप्रसंगी अध्यक्ष रो.मनोज जोशी ,मा.सचिव रो.ॲड.हेमंत भंगाळे, ऑर्गन डोनेशन कमिटी चेअरमन रो.डॉ. शशिकांत गाजरे, पी.पी.रो.जितेंद्र ढाके, रो. स्वाती ढाके तसेच कॉलेजचे प्राचार्य, शिक्षक वृंद व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

२०१६ पासून महाराष्ट्र शासनाने ही 'महाअवयदान अभियान' हा अवयव दानाचा उत्सव दरवर्षी ऑगस्ट महिन्यात साजरा केला जातो.अवयवदान मध्ये जिवंत व्यक्ती मधून किडनी, फुफ्फुस, लिव्हर, मोठे आतडे ,लहान आतडे, स्वादुपिंड, त्वचा यांचे दान करता येते. तर मेंदू मृत रुग्णांमधून सुद्धा अवयव दान करता येते. यात किडनी, लिव्हर, फुफ्फुस ,कॉर्निया ,हाडे, हात ,हृदय, स्वादुपिंड, ग्रंथी, आतडे यांचे दान करता येते. जगातील सर्वाधिक नेत्रहीन व्यक्ती भारतात आहे . जगातील सर्वात जास्त नेत्रदान श्रीलंकेत केले जाते .एका व्यक्तीने केलेल्या नेत्रदानामुळे कमीत कमी दोन अधिक व्यक्तींना दृष्टी लाभ होतो. मृत्यूनंतर नेत्रदान ,त्वचादान ,अवयव दान ,देहदान यापैकी सर्व किंवा कोणतीही निवडक दान करू शकतो. टीबी ,कॅन्सर ,डेंग्यू ,गॅंगरीन ,कावीळ, हेपिटेटिस, सेफ्टीसेमिया , एचआयव्ही यासारख्या संसर्गजन्य व्याधीने मृत्यू झाल्यास यांचे अवयदान शक्य नसते. मृत्यू प्रत्येकाला केव्हा ना केव्हा येणारच परंतु अवयव दान केल्यामुळे गेलेली व्यक्ती कोणाच्यातरी शरीरात अवयव रूपाने जिवंत आहे हे समाधान दुःख हलके करते.

मरता है शरीर ,अमर है आत्मा अवयव दान करणे से मिलता है स्वयं परमात्मा

स्वतः अवयव दानाचा फॉर्म भरून कार्यकर्ते बना व इतरांना प्रवृत्त करा.

# पाणी आणि स्वच्छता

माजी अध्यक्ष रो. डॉ. तुषार फिरके



मार्चची रोटरी थीम, पाणी आणि स्वच्छता, आम्हाला जीवन बदलणाऱ्या सुधारणांवर लक्ष केंद्रीत करण्यास सांगते जे आम्ही या आंतरराष्ट्रीय प्रकल्पांद्वारे सर्व लोकांना अधिक सहजतेने उपलब्ध आणि निरोगी पाणी पुरवठा करण्यासाठी करू शकतो. स्वच्छ पाणी ही मानवाची मूलभूत गरज आहे. जेव्हा लोक, विशेषत: लहान मुलांना स्वच्छ पाणी मिळते तेव्हा ते निरोगी आणि अधिक उत्पादक जीवन जगतात. तथापि, दररोज किमान ३,००० मुले असुरक्षित पाण्यामुळे होणा–या रोगांमुळे मरतात, जे आमच्या सदस्यांना विहिरी बांधण्यासाठी, पावसाच्या पाण्याची साठवण यंत्रणा बसवण्यास आणि समुदायाच्या सदस्यांना नवीन पायाभूत सुविधांची देखभाल कशी करावी हे शिकवण्यासाठी प्रेरित करते. खूप कमी लोक तहानेने मरतात, तर लाखो लोक जलजन्य रोगांमुळे मरतात, ज्यामुळे आमच्या सदस्यांना अविकसित देशांमध्ये स्वच्छता सुविधा सुधारण्यासाठी प्रेरणा मिळते. सदस्य शौचालये आणि शौचालये प्रदान करून सुरुवात करतात जे गटार किंवा सुरक्षित आवारात वाहून जातात आणि नंतर हात धुणे आणि इतर चांगल्या स्वच्छतेच्या सवयींना प्रोत्साहन देण्यासाठी शैक्षणिक कार्यक्रम जोडतात.

रोटरीने ज्या विविध जलप्रकल्पांमध्ये सहभाग घेतला आहे, त्यांतून, जीवनाच्या काही मूलभूत गरजांच्या बाबतीत जगभरातील अनेक लोकांना कोणत्या अडथळ्यांचा सामना करावा लागतो हे आम्हाला कळले आहे. आम्हाला ज्या स्वच्छ आणि सामान्यतः सुरक्षित आणि मुबलक पाण्याचे स्रोत आहेत ते आम्ही गृहीत धरतो. रोटरी इंटरनॅशनल, वैयक्तिक रोटेरियन आणि रोटरी क्लबच्या एकत्रित कृतींद्वारे, सर्व लोकांना स्वच्छ आणि सुरक्षित पाण्याचा पुरेसा प्रवेश आहे याची खात्री देण्याचा प्रयत्न करते. शांतता प्रयत्नांना पाठिंबा देण्यासाठी आणि पोलिओचा कायमचा अंत करण्यासाठी आंतरराष्ट्रीय संबंध निर्माण करण्यासाठी, जीवन सुधारण्यासाठी आणि एक चांगले जग निर्माण करण्यासाठी रोटरी सात क्षेत्रांना समर्पित आहे. पाणी आणि स्वच्छता ही त्या सात क्षेत्रांपैकी एक आहे.

समस्या अशी नाही की जगाचे पाणी संपेल (ती रक्कम बाष्पीभवन आणि पुन: संक्षेपणाद्वारे निश्चित केली जाते). समस्या म्हणजे पाण्याचे असमान वितरण आणि पिण्यासाठी सुरक्षित पाण्याची खात्री देण्यासाठी सार्वत्रिक योग्य स्वच्छता पद्धतींचा अभाव. काही प्रदेश आणि लोक नक्कीच इतरांपेक्षा जास्त जोखीम आणि अधिक लक्ष देण्यास पात्र असताना, आम्ही अलीकडे पाहिले आहे की कोणतीही लोकसंख्या चिंतामुक्त नाही. फ्लिंट, मिशिगन आणि दक्षिण आफिक्रेच्या केपटाऊनसाठी डे झिरो जवळ येत असलेल्या मुख्य समस्यांचा विचार करा (जे सुदैवाने पुढे हलवले गेले आहे आणि कदाचित कधीही होणार नाही). पाणी आणि स्वच्छताविषयक समस्या हे निश्चितपणे ठख साठी लक्ष केंद्रीत करणारे क्षेत्र राहतील आणि रोटेरियन म्हणून आमचे लक्ष वेधून घेण्यास पात्र आहेत.

समस्या अशी नाही की जगाचे पाणी संपेल (ती रक्कम बाष्पीभवन आणि पुन: संक्षेपणाद्वारे निश्चित केली जाते). समस्या म्हणजे पाण्याचे असमान वितरण आणि पिण्यासाठी सुरक्षित पाण्याची खात्री देण्यासाठी सार्वत्रिक योग्य स्वच्छता पद्धतींचा अभाव. काही प्रदेश आणि लोक नक्कीच इतरांपेक्षा जास्त जोखीम आणि अधिक लक्ष देण्यास पात्र असताना, आम्ही अलीकडे पाहिले आहे की कोणतीही लोकसंख्या चिंतामुक्त नाही. फ्लिंट, मिशिगन आणि दक्षिण आफ्रीकेच्या केपटाऊनसाठी डे झिरो जवळ येत असलेल्या मुख्य समस्यांचा विचार करा (जे सुदैवाने पुढे हलवले गेले आहे आणि कदाचित कधीही होणार नाही). पाणी आणि स्वच्छताविषयक समस्या हे निश्चितपणे लक्ष केंद्रीत करणारे क्षेत्र राहतील आणि रोटेरियन म्हणून लक्ष वेधून घेण्यास पात्र आहेत. रोटरी कशी मदत करते रोटरीने आपल्या सदस्यांना एक जागतिक आव्हान दिले आहे, त्यांना शैक्षणिक गुणवत्ता आणि प्रवेश सुधारण्यासाठी एकत्रितपणे काम करण्यास सांगितले आहे‸ विशेषतः मुलींसाठी‸ शिक्षक प्रशिक्षण, अभ्यासक्रम आणि पाणी, स्वच्छता आणि स्वच्छता सुविधा सुधारण्यासाठी समुदायांसोबत काम करायला सांगून. जसे शाश्वत पाणी, स्वच्छता (वॉश) आणि शिक्षण प्रकल्प विकसित करण्यासाठी रोटरीचे लक्ष्य आव्हान पाच देशांमध्ये चालवले जात आहे: बेलीझ, ग्वाटेमाला, होंडुरास, भारत आणि केनिया. रोटरी आश्चर्यकारक गोष्टी घडवते, जसे की: १. शाश्वत पाणी आणि स्वच्छता प्रणाली विकसित, निधी आणि देखरेख करण्यासाठी समुदायांची क्षमता मजबूत करा. २. सुरक्षित पाणी, सुधारित स्वच्छता आणि स्वच्छतेसाठी समान समुदाय प्रवेश प्रदान करा. ३. सुरक्षित पाणी, स्वच्छता आणि स्वच्छतेच्या फायद्यांबद्दल समुदायांची जागरूकता वाढवणारे समर्थन कार्यक्रम. ४. पाणी आणि स्वच्छता संबंधित करिअर–मनाच्या व्यावसायिकांच्या अभ्यासाला समर्थन द्या. ५. जगभरातील उच्च–गुणवत्तेचे पाणी आणि स्वच्छता प्रकल्प सुलभ, मोजमाप आणि वर्धित करणारी साधने आणि संसाधने तयार करा.

# राजा रयतेचा

रो. जयवर्धन नेवे



रोटरी प्रणाम ,

अबाल वृद्धांच्या गळ्यातला ताईत असलेले शिवाजी महाराज, हिंदू संस्कृतीचे अविभाज्य घटक आहे. फक्त महाराष्ट्राचेच महाराज नसून त्यांनी दिल्लीपर्यंत आपला झेंडा फडकवलेला आहे. त्यांचाच सांस्कृतिक वारसा आपल्याला पुढे न्यायचा आहे आणि तो पुढच्या पिढीसमोर सादर करण्याचा आम्ही एक छोटासा प्रयत्न करत आहोत. आतापर्यंत दिग्गजांनी महाराजांवर अभ्यास केलेला आहे. पीएचडी केलेला आहे. महाराजांचे मॅनेजमेंट, महाराजांचे कर्तुत्व, त्यांचे विविध कौशल्य व गुण याबद्दल किती काही बोलता येईल– लिहिता येईल. आम्ही निवडलेला मार्ग म्हणजे नाट्यसादरीकरणातून महाराजांचे चरित्र समाजातील सर्व स्तरांपर्यंत पोहोचवणे.डिसेंबर २०२२ मध्ये सुरू झालेली संस्था श्री शिवरत्न प्रतिष्ठान जळगाव नुकतेच आपले पहिले वर्ष पूर्ण करत आहे. विशेष नमूद करण्याचे कारण की राजा रयतेचा हे महानाट्य आपल्या जळगावात इतक्या मोठ्या प्रमाणात उभे करण्याचे धाडस ह्या संस्थेने केले व विशेष नावारूपाला आली. ८ ते १० मित्र मिळून उभी राहिलेले संस्था, व या क्षेत्रातील कोणतेही अनुभव पाठीशी नसलेले सदस्य इतके मोठे धाडस करू शकले व त्यात यशस्वी झाले. राजा रयतेचा हे महानाट्य जळगाव मध्ये जळगाव वासियांसाठी मागील वर्षी ३५० व्या शिवजयंतीला सादर करण्यात आले, घोडे, बैलगाडी, जिवंत देखावे,फटाक्यांची आतिषबाजी, जुना पोशाख, वाद्यवृंद व संपूर्ण शिवकाळ उभा करण्यात श्री शिवरत्न प्रतिष्ठान यशस्वी झाले. जळगावकरांनी एक दैदिप्यमान व अभूतपूर्व असा शिवराज्याभिषेक सोहळा पाहिला ६००० नागरिकांनी आपली उपस्थिती या महानाट्यास दिली होती. शिवशाहीर दादा नेवे यांच्या लेखणीतून उभे राहिलेले हे महानाट्य तसेच हेमंत पाटील यांनी दिग्दर्शित केलेले हे महानाट्य जळगावकरांच्या विशेष पसंतीस उतरले. जळगावातील काही युवक जिद्दीला पेटून व महाराजांचा आदर्श मनात ठेवून या कामास लागले. ह्या नाटकाचे विशेषत्व म्हणजे या नाटकातील सर्व पात्र स्थानिक कलावंत असून यातील महिला या व्यावसायिक नसून घरात काम करणाऱ्या गृहिणी आहेत तसेच यातील पुरुष मंडळी देखील कोणी व्यवसाय तर कोणी नोकरी करणार आहे. अशाच ११० हिऱ्यांना घेऊन हे महानाट्य उभे केले.

तोच अनुभव पाठीशी घेऊन हे महानाट्य विदर्भात सुद्धा यशस्वी पद्धतीने पार पडले तसेच जळगाव जिल्ह्यात देखील या नाटकाचे प्रयोग करण्यात आले व ते यशस्वी झाले देखील. तोच अनुभव पाठीशी घेऊन पुन्हा एकदा राजा रयतेचा( शिवजन्म ते शिवराज्याभिषेक) हे २.३० तासाचे महानाट्य येत्या ३५१ व्या शिवजयंतीला दिनांक ८,९ व १० मार्च रोजी आपल्या शहरातील खानदेश सेंट्रल मैदान येथे सादर करणार आहोत. हे महानाट्य कोणत्याही व्यावसायिक स्वरूपाचे नसून जळगावकरांसाठी विनामूल्य असे सादर करणार आहोत. लोकवर्गणीतून व लोकसहभागातून हे महानाट्य उभे करण्याचा आमचा मानस याही वर्षी आहे, तरीही आमच्या या प्रयत्नांना आपण योग्य ती साद घालावी व आपले मार्गदर्शन कायम आमच्या सोबत असावे ही प्रतिष्ठानच्या वतीने आपणास नम्र विनंती.



# क्षणचित्रे....






भैय्यासाहेब नथमलजी लुंकड सभागृह


भैय्यासाहेब नथमलजी लुंकड
Rotary Club Jalgaon
R.I.Dist. 3030 | Club No.15512 | RIY : 2023-24




Rotary Club
Jalgaon
7X7X7 Session...
रोटरी क्लब जळगांव
संचलित
इंटरॅक्ट क्लब ऑफ


श्रीराम प्राथ.व माध्यमिक विद्यालय
Rotary
CREATE HOPE in the WORLD
Rotary Club


Rotary
RID 3030
INTERNATIONAL HARMONY SUMMIT 2023-24
Rotary Jalgaon East & Rotary Parivaar, Jalgaon.

# रोटरी एक अविस्मरणीय प्रवास

रो. डॉ.काजल फिरके



रोटरी इंटरनॅशनलची स्थापना पॉल हॅरिस सर यांनी १९०५ साली केली. अनेक वर्षांच्या संघर्षानंतर फक्त पुरूषांनाच रोटरी क्लब चे सभासदत्त्व देणाऱ्या या संघटनेत महिलांनाही समाविष्ट करून घ्यावे असे १९८७ साली युनायटेड नेशन्स, सुप्रीम कोर्टाने अधिकृतरित्या जाहीर केले. 'सिल्हीया व्हीलॉक' या रोटरी क्लब 'ड्युरेट कॅलिफोर्नियाच्या जगातील प्रथम रोटरी महिला अध्यक्ष बनल्यात. त्यानंतर महिला रोटेरियन्स्ची संख्या वाढत गेली.

रेटरी २०१४-१५ मध्ये मी रोटरीची सभासद झाले. याआधी मी माझे मिस्टर डॉ.तुषार फिरके यांच्या सोबत अनेक प्रोजेक्ट मध्ये सहभागी झाले होते. रोटरीचे काम अतिशय जवळून पहायला मिळाले. या अगोदर इनरव्हील क्लब ऑफ जळगाव ईस्टची मेंबर होती. त्यामुळे रोटरी मध्ये आपण पण मेंबर व्हावे आणि अधिकाधिक प्रोजेक्ट मध्ये सहभागी होवून काम करावे, अशी प्रामाणिक इच्छा निर्माण झाली. २०१४-१५ मध्ये रो.मंगला जंगले मॅडम, रोटरी अध्यक्षा होत्या. डॉ.तुषार फिरके मा.सचिव होते. या काळामध्ये रोटरी जवळून पहायला भेटली. रोटरीचं काम करण्याची पद्धत जवळून पाहिली. खूप काही चांगले शिकायला मिळाले. 'शिस्त' ही एक अनमोल देणगी माझ्या जीवनाला मिळाली. यामुळे २०१५-१६ मध्ये मी इनव्हरव्हील क्लबची अध्यक्षा म्हणून धुरा अत्यंत चोखपणे सांभाळली. रोटरीतील शिस्तीने काम करण्याची पद्धत मी या ठिकाणी अवलंबिली. नियोजनबद्ध काम केले आणि त्याचीच फलश्रृती म्हणून त्यावर्षी अध्यक्षा म्हणून क्लब करीता १५ पैकी १३ अॅवॉर्ड आणले. शिवाय बेस्ट प्रेसिडंटचा अॅवॉर्डही मिळाला.

पुढे रोटरी मध्ये अनेक वेळा मेडीकल कमिटी चेअरमन म्हणून काम केले. त्या अंतर्गत अनेक मेडीकल प्रोजेक्ट यशस्वीरित्या पार पाडले. जसे स्क्विंट सर्जरी कॅम्प, जामन्या, गाडऱ्या मेडीकल चेक अप कॅम्प, पद्मालय या ठिकाणी मेडीकल कॅम्प, विविध शाळा फॅक्टरी या ठिकाणी घेतलेले कॅम्प स्टॅाप एनइडी प्रोजेक्ट, हाडांच्या ठिसूळतेची तपासणी, रोटरीयन्स व त्यांच्या फॅमिलीसाठी संपूर्ण मेडीकल चेकअप इत्यादी अनेक प्रोजेक्ट घेतले. यामध्ये डॉ.तुषार फिरके व इतर सर्व रोटेरियन्स्, डॉक्टर्स यांची अमूल्य साथ वेळोवेळी मिळाली.

रोटरी वर्ष २०२०-२१ मध्ये मला अध्यक्ष पी.पी.रो.जितेंद्र ढाके यांच्या समवेत सचिव म्हणून कार्य करण्याची संधी उपलब्ध झाली. यावर्षी कोरोनाची आणीबाणी होती. त्यामुळे सुरूवातीच्या मिटींग्ज् ऑनलाईन झूम प्लॅटफॉर्म वर घेण्यात आल्या. कोणत्याही प्रकारची बाधा न येता ही मिटींग पार पाडणे एक प्रकारचे चॅलेंज होते. तसेच सर्वच जण या अशा प्रकारच्या मिटींगला नवीन होते. तसेच मिटींग बंद पडू नये म्हणून स्ट्राँग वायफायची देखील आवश्यकता असे. मग आम्ही लगेच जुना प्लॅन बदलून नवीन वायफाय लावले. तसेच त्यावेळी लोकांना ऑक्सीजन, मेडीकल इक्वीपमेंट, औषधे, भाजीपाला इ. अनेक जीवनावश्यक गोष्टींची गरज भासत होती. यावर्षी खूप वेगळ्या प्रकारचे प्रोजेक्ट करण्याची संधी मिळाली होती. प्रज्ञाचक्षू व्यक्तींना, एच.आय.व्ही. बाधीत महिलांना यावर्षी आम्ही रेशन देखील पुरविले. हे सर्व करत असतांना आयुष्याबद्दल खूप काही शिकायला मिळाले. पी.पी.रो.जितेंद्र ढाके यांच्या कडून यावर्षी खूप काही शिकायला मिळाले.

'माय रोटरी' वरती अनेक रोटेरियन्सचे अकाऊंट रजिस्टर करून दिले. या काळात मला सचिव पदासाठी डिस्ट्रीक्ट चे कोहीनूर सेक्रेटरी म्हणून अॅवार्ड मिळाले. तसेच मी पॉल हॅरिस फेलो (२ वेळा) आहे. हे सर्व करत असतांना माझी हॉबी, पॅशन, असलेले आर्ट अॅन्ड क्रॉफ्ट हे जपले. मनावरचा ताण यामुळे कमी होण्यास मदत झाली. रोटेरियन म्हणून काम करत असतांना आयुष्यातील हे दिवस कायम आठवणीत राहतील. कारण माझ्या आयुष्याला शिस्तबद्धता ही रोटरीमुळे मिळाली. अनेक चांगले वाईट अनुभवातून खूप शिकायला मिळाले. नवनवीन माणसे आयुष्यात जुळत गेले आणि आता या रोटरी परिवाराचा एक मी हिस्सा बनले. जीवाभावाची माणसे या रोटरीमुळे मिळाली. आयुष्याला एक नवीन वळण लाभले.

माझ्या रोटरी लोकात, चंद्र मावळत नाही, दर्या अथांग प्रेमाच, वादळत नाही.

आणि अशा प्रकाश वाटा रेखात मी आस्था आणि सद्भाव यांची उपासना करते. रोटरीच्या उद्दिष्टपूर्तीसाठी कटिबद्ध होते.

जय रोटरी!!!

# जीवेत् शरदः शतम्...!

| | |
|---|---|
| १) १३ मार्च | रो. हेमिन काळे |
| २) २२ मार्च | पी.पी. रो. छबीलदास शहा |
| ३) २३ मार्च | पी.पी. रो. किशोर मंडोरा |
| ४) २६ मार्च | पी.पी. रो. डॉ. प्रदीप जोशी |
| ५) ३० मार्च | रो. स्वाती ढाके |

# नांदा सौख्यभरे...

| | |
|---|---|
| १) १ मार्च | रो.प्रज्ञा व पीपी.रो.प्रविण जंगले |
| २)३ मार्च | पीपी रो.डॉ.जयंत जहागिरदार |
| ३) ३ मार्च | रो. राजेश वेद |
| ४) ५ मार्च | रो. किरण बेंडाळे |
| ५) ८ मार्च | रो. आकाश डोकानिया |
| ६) ११ मार्च | रो. सुभाष अमळनेरकर |
| ७) १७ मार्च | रो. आशुतोष पाटील |
| ८) १८ मार्च | रो. ॲड. श्रीकांत भुसारी |

## रोटरी मैत्री विनिमय

रोटरी मैत्री विनिमय रोटरी सदस्य आणि त्यांच्या कुटुंबियांना जगातल्या इतर सदस्य आणि त्यांच्या कुटुंबियांना भेटण्यास प्रोत्साहीत करतात. मैत्री विनिमय संघ ते संघ (व्यक्तीगत रोटरी सदस्य आणि त्यांचे कुटुंब) किंवा जिल्हा ते जिल्हा (चार ते सहा रोटरी दंपत्ती).

एका रोटरी मैत्री विनिमय कार्यक्रमात, बरेच रोटरी दंपत्ति दुसऱ्या देशांचे भ्रमण करायला जातात. तेव्हा तेथले दंपत्ती त्यांच्या देशाचं भ्रमण करायला येतात तेव्हा त्यांचे आदरातिथ्य केले जाते. प्रायोगिक कार्यक्रमाला चांगला प्रतिसाद मिळाल्यानंतर १९८८ साली रोटरी मैत्री विनिमय कार्यक्रम रोटरीचा गठीत कार्यक्रम झाला.

रोटरी मैत्री विनिमय कार्यक्रमाची तुलना बरेचदा रोटरी संस्थापनेच्या समूह शिक्षा विनिमय बरोबर केली जाते. फक्त ऐवढेच आहे रोटरी सदस्य दंपत्ती आपल्या परदेशाचा भ्रमण खर्च स्वत: उचलतात. इतर वेळेला अशक्य होणारी मैत्री अशाने शक्य होते.

ज्या रोटरी सदस्यांना विशिष्ट व्यवसाय व शिष्यवृत्तीचा वेध आहे त्यांनी रोटरी मित्रता विनिमय कार्यक्रमाबद्दल विस्तृत चौकशी केली पाहिजे. रोटरीचे काही उत्तेजक व साहसिक कार्य तुमची वाट बघत आहेत!

# अभिनंदन!

- जळगाव शहर महानगरपालिका जळगाव तर्फे पी.पी.रो.डॉ.तुषार फिरके यांची राष्ट्रीय नागरी उपजिविका अभियान अंतर्गत पुनर्गठित 'निवारा व्यवस्थापन समिती' चे सदस्य पदी तिसऱ्यांदा नियुक्ती झाली.
- रो.गिरीश कुलकर्णी आणि रो.पंकज व्यवहारे यांना शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय, जळगाव येथे विद्यार्थी काऊन्सलर (सल्लागार) म्हणून नियुक्ती.
- पी.पी.रो.डॉ.तुषार फिरके यांची महाराष्ट्र युनिर्व्हसिटी ऑफ हेल्थ, सायन्स नाशिक यांच्या आयुष कमिटीत इंटीग्रेटेड फॅमिली मेडीसीन साठी नियुक्ती करण्यात आली.
- रो. हेमकांत बाविस्कर यांना महाराष्ट्र आरोग्य मंडळ पुणे ' दादा गुजर पुरस्कार' प्राप्त झाला.